**(इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद )**

**(१९६१) २ एस. सी. आर. ६६४**

**मेसर्स मदन मोहन दम्मा माल लिमिटेड आणि एक**

**-विरुद्ध -**

**पश्चिम बंगाल राज्य आणि एक**

**( न्यायमूर्ती जफर इमाम, न्यायमूर्ती ए.के.सरकार आणि न्यायमूर्ती रघूबर दयाल )**

*अन्न भेसळ - विक्रीसाठी भेसळयुक्त तेलाचा साठा करणे - गृहीतक ,चे खंडन कलम ४६२, कलकत्ता म्युनिसिपल अधिनियम ,१९५१( १९५१ चा प.बी. अधिनियम ३३)*

प्रथम अपीलकर्ता क्रमांक.१ याने टँक वॅगन मध्ये मोहरीच्या तेलाची खेप फिरोझाबाद, यू.पी.येथून स्वतःलाच कलकत्ता येथे पाठवली, जिथे त्याने रेल्वे प्राधिकाऱ्याकडून वॅगनची सोडवणूक करून घेतली. अन्न निरीक्षकाने वॅगन मधून तेलाचे नमुने घेतले जे विश्लेषणानंतर भेसळयुक्त असल्याचे आढळले. अपीलकर्त्यां विरुद्ध विक्रीसाठी भेसळयुक्त मोहरी तेलाचा साठा केल्याबद्दल कलकत्ता कॉर्पोरेशन अधिनियम १९५१ च्या कलम ४६२ खाली खटला भरण्यात आला. अपीलकर्त्यांनी अशी बाजू मांडली कि यू. पी. ऑईल मिलर्स असोसिएशन आणि पोलिस उपायुक्त यांच्यातील विवक्षित व्यवस्था आणि नमुना घेऊन त्याची चाचणी करण्यात यावी,"जेणे करून विश्लेषण केल्यावर तेल शुद्ध आढळले तर अपीलकर्त्यांना तेलाची माल पोचवणी घेता येईल" अशी विचारणा करणारे अपीलकर्त्यानी असोसिएशनला लिहलेले पत्र लक्षात घेता,मोहरीच्या तेलाचा साठा हा विक्रीसाठी केला होता असे कलम ४६२ च्या उप-कलम (४) च्या खालील गृहीतक खंडनीय आहे.

असा निर्णय देण्यात आला कि तेलाचा साठा विक्रीसाठी करण्यात आला होता अशा गृहितकाचे खंडन करण्यासाठी हे पुरेसे नाही. पत्रात असे म्हटले नव्हते कि तेलाची विक्री करण्यात येणार नाही; तेल अशुद्ध आढळ्यास काय करण्यात येईल याबाबत काही नमूद नव्हते. कारवाई करण्यासाठी एकमेव प्राधिकारी कोण असेल याविषयी असोसिएशन आणि कॉर्पोरेशन यांच्यात कोणतीही व्यवस्था नव्हती. व्यवस्था आणि पत्र हे तपास अवघड करण्यासाठी एक साधन होते.

**फौजदारी अपिल अधिकारिता** :- फौजदारी अपील क्रमांक.११८/१९५९.

खटला क्रमांक २०८बी /१९५५ मध्ये म्युनिसिपल दंडाधिकारी, कलकत्ता यांच्या दुसऱ्या न्यायालयात १६ जानेवारी १९५६ च्या न्यायनिर्णय आणि आदेशातून उद्भवलेल्या फौजदारी अपील क्रमांक.१०१/१९५६ मध्ये कलकत्ता उच्च न्यायालयाच्या २ जुलै १९५७ च्या निकाल आणि आदेशावरून विशेष परवानगीद्वारे अपील.

अपीलकर्त्यासाठी:- सी. बी. अग्रवाल, बी. बी. तवकले आणि बी. पी. माहेश्वरी.

उत्तरवादी क्रमांक.२ साठी नलिन चंद्र बॅनर्जी, सुनील के. बासू , पी. के. बोस साठी एस. एन. मुखर्जी.

न्यायालयाच्या न्यायनिर्णय २४ नोव्हेंबर १९६० रोजी **न्यायमूर्ती रघुबर दयाल** यांनी पारित केला :- कलकत्ता म्युनिसिपल अधिनियम १९५१ (१९५१ *चा प.बी. अधिनियम ३३*) त्यानंतर अधिनियम संबोधले जाते- च्या कलम ४६२ अंतर्गत अपीलकर्ते मेसर्स मदन मोहन दम्मा मल लिमिटेड आणि त्याचे व्यवस्थापक ओम प्रकाश मांगलिक यांच्या दोष सिद्धीला पुष्टी करणाऱ्या कलकत्ता उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात विशेष परवानगीद्वारे केलेली ही अपील आहे.

या अपीलाकडे नेणारी तथ्ये अशी आहेत की मेसर्स मदन मोहन दम्मा मल लिमिटेडने (यापुढे अपीलकर्ता क्रमांक १ म्हणून संभोधले जाते) सुमारे ४९९ मौन्ड्स वजनाच्या मोहरीच्या तेलाची खेप फिरोझाबाद उत्पादनाच्या ठिकाणाहून स्वतःलाच टँक वॅगन क्रमांक ७५६१२ मध्ये कलकत्ता येथे २५ डिसेंबर १९५४ रोजी स्वतःला पाठवली. ही वॅगन ३ जानेवारी १९५५ रोजी सकाळी ८.४५ मिनिटांनी कलकत्ता येथील पाथुरियाघाटला सायडिंगला ठेवण्यात आली होती. कोलकाता कॉर्पोरेशनचे अन्न निरीक्षक डॉ. नित्यानंदा बागुई, काही पोलिस अधिकाऱ्यांसोबत त्या साईडिंगला गेले आणि त्यांनी त्या वॅगनमध्ये असलेल्या मोहरीच्या तेलाचे तीन नमुने घेतले, अपीलकर्ता क्रमांक.२ ओम प्रकाश मांगलिक, जो वॅगनजवळ आढळून आला होता त्याची व्यवस्था केल्या नंतर, ८ आण्याला १२ औंचेस तेलाची खरेदी करून घेतली. त्यांनी तेलाचे नमुने तीन कुपिकांमध्ये घेतले. त्यांना योग्य प्रकारे मोहोरबंद करण्यात आले होते. त्यापैकी एक अपीलकर्ता क्रमांक.२ ला देण्यात आली. बाकीचे दोन डॉ.बागुई यांनी ठेवले होते. त्यांनी त्याच दिवशी त्यापैकी एक सार्वजनिक विश्लेषकांकडे

विश्लेषणासाठी पाठविले. सार्वजनिक विश्लेषक अशित रंजन सेन यांनी ३ जानेवारी १९५५ रोजी त्या कुपिका मध्ये असलेल्या तेलाचे विश्लेषण केले परंतु त्याच्या शुद्धतेबद्दल कोणतेही सकारात्मक मत मिळवू शकले नाही. तथापि, डॉ.बागुई यांनी त्या संध्याकाळी टँक वॅगन जप्त केले, कॉर्पोरेशन च्या सील ने मोहरबंद केले आणि ते अपीलकर्ता क्रमांक.२ च्या ताब्यात ठेवले. ६ जानेवारी १९५५ रोजी टँक मधील तेल अपीलकर्त्यांच्या गोदामात टाकण्यासाठी परवानगी देण्यात आली. त्यानंतर गोदामाचे कुलूप कॉर्पोरेशन च्या शिक्क्याने मोहरबंद करण्यात आले. श्री. सेन यांनी ४ जानेवारी १९५५ रोजी तेलात भेसळ असल्याचा अहवाल दिला. त्यांनी २४ जानेवारी १९५५ रोजी विश्लेषणाच्या निष्कर्षाबद्दल सविस्तर अहवाल पाठवला. मोहरीच्या तेलात भेसळ असल्याचा अहवाल प्राप्त होताच, डॉ.बागुई यांनी ४ फेब्रुवारी १९५५ रोजी अपीलकर्त्यांविरुद्ध मोहरीचे तेल विकणे आणि विक्री साठी ठेवणे या संदर्भात तक्रार दाखल केली, ज्याचा एक नमुना मोहरीच्या तेलाचा असून त्यात शेंगदाणा तेलाची भेसळ असल्याचे आढळून आले.

खटल्याच्या चौकशीदरम्यान, न्यायचौकशी न्यायालयाने अपीलकर्त्यांच्या वतीने केलेल्या अर्जाच्या आधारे, कॉर्पोरेशन च्या आरोग्य अधिकाऱ्याच्या ताब्यात असलेल्या तेलाच्या तिसऱ्या नमुन्याची कुपिका, पश्चिम बंगाल सरकारच्या आरोग्य सेवा संचालकाकडे, विश्लेषण आणि अहवालासाठी पाठवण्याचे आदेश दिले. या नमुन्याचे विश्लेषण न्यायालयीन साक्षीदार क्रमांक.१ गुलाल चंद्र डे यांच्या द्वारे करण्यात आले आणि त्यात शेंगदाणा तेल भेसळ करण्याचे आढळले . तथापि, विश्लेषकाचा अहवाल डॉ. एस. के. चॅटर्जी, डी.डब्ल्यू.२,आरोग्य सेवाचे उपसंचालक,पश्चिम बंगाल सरकारच्या स्वाक्षरीने न्यायालयात पाठविण्यात आला.

अपीलकर्त्यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या तेलाचे नमुने ओम प्रकाश, तेल तज्ज्ञ, उत्तर प्रदेश सरकार यांच्याकडे पाठवल्याचे दिसत आहे, ज्यांनी दि. २७ जुलै १९५५ रोजी अहवाल दिला की हा नमुना 'मोहरीच्या तेलासाठीच्या एगमार्क विनिर्देशांसोबत अनुरूप आहे आणि ती तीळ, भुईमूग आणि अळशीच्या तेलासारख्या भेसळयुक्त पदार्थांपासून मुक्त आहे' असे मानण्यात आले आहे. मात्र, हा अहवाल सिद्ध करण्यात आलेला नाही.

दि. १० जानेवारी १९५५ रोजी, पोलीस उपायुक्त, अंमलबजावणी शाखा, कलकत्ता यांनी मोहरीच्या तेलाचे नमुने सार्वजनिक विश्लेषक, अन्न आणि पाणी, पश्चिम

बंगाल सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठवले. श्री. एस. एन. मित्रा, डी. डब्ल्यू. ७ यांनी या नमुन्याची तपासणी केली, त्या नमुन्याचे सॅपोनिफिकेशन मूल्य १७३.३ आणि आयोडीन मूल्य १०५ या आधारावर अहवाल दिला की हा नमुना अस्सल मोहरीच्या तेलाच्या मानकांशी सम आलेले आहे. हा नमुना शुद्ध मोहरीच्या तेलाचा होता हे या अहवालातून सिद्ध होत नाही. पोलीस उपायुक्तांनी स्पष्टीकरणासाठी विचारलेल्या प्रश्नाला श्री मित्रा यांनी दिलेले उत्तर हे याबद्दल अगदी स्पष्ट करते. ते असे आहेः

"परंतु, भिन्न तेलाच्या उपस्थिती बाबत, काही उदाहरणांमध्ये नेहमीच्या तेलातील घटकांच्या आकड्यांद्वारे पुष्टी केलेला, निर्णायक पुरावा मिळेपर्यंत, नमुना भेसळयुक्त नसतो आणि भेसळयुक्त असल्याचे घोषित केले जाऊ शकत नाही. प्रस्तुत प्रकरणात मोहरीच्या तेलाच्या नमुन्याची आधीच परिपूर्ण तपासणी करण्यात आली आहे आणि 'मानकांशी सम आले आहे' म्हणून प्रमाणित केले गेले आहे मात्र ते तितके अस्सल आहे याबद्दल प्रमाणित करण्यात आले नव्हते. ह्या शब्दप्रयोगाचा कायदेशीर परिणाम असा होईल कि त्या नमुन्याला संशयाचा फायदा मिळेल."

पुढे, श्री मित्रा यांना पाठवलेला नमुना हा अपीलकर्त्यांच्या टँक वॅगन मधील तेलाचा नमुना होता हे सिद्ध करण्यासाठी अभिलेखावर कोणताही चांगला पुरावा नाही.

डॉ. बागुई यांनी पोलिसांच्या माणसांनी तेलाचे नमुने घेतल्याबद्दल साक्ष मध्ये नमूद केले नाही. त्यास पोलिसांनी तेलाचे कोणतेही नमुने घेतल्याबद्दल प्रश्न करण्यात आला नाही. पोलिसांनी विश्लेषण करण्यासाठी आणि मोहरीचे तेल शुद्ध होते की नाही हे शोधण्यासाठी तेलाचे नमुने घेण्याचे कोणतेही योग्य कारण दिसत नाही. अपीलकर्त्यांच्या वतीने डॉ. बागुई यांच्या उलटतपासणीदरम्यान त्यांना समोर असे मांडण्यात आले कि, त्यांनी स्वतः प्रश्नास्पद मोहरीच्या तेलाचे चार नमुने घेतले होते आणि त्यापैकी एक नमुना अंमलबजावणी शाखेकडे पाठवण्यात आला होता. डॉ. बागुई यांनी मोहरीच्या तेलाचे चार नमुने घेतल्याचे नाकारले. या प्रसंगी डॉ. बागुई यांच्यासोबत असलेले कालिदास गंगुली, उपनिरीक्षक, कलकत्ता अंमलबजावणी शाखा, पोलीस विभाग यांच्या बायनाने, डॉ. बागुई यांच्या साक्षेला पूर्णपणे पुष्टी मिळाली आहे. त्यांनी सांगितले की महानगरपालिकेच्या अन्न निरीक्षकांनी तीन नमुने घेतले आणि पोलिसांनी एक नमुना घेतला, जो महामंडळाच्या शिक्क्याने सीलबंद करण्यात आला होता. पोलिसांनी

प्रत्यक्षात तेलाचा एक नमुना घेतला व  आणि  तो महामंडळाच्या शिक्क्याने सील केला असे कालिदास गांगुली यांनी आपल्या साक्ष मध्ये सांगितले होते, यावर आम्ही समाधानी नाही.

कनिष्ठ न्यायालयांनी पुराव्यांच्या आधारे असा निष्कर्ष दिला कि, अपीलकर्त्यांच्या टँक वॅगनमधील मोहरीच्या तेलात भुईमूग तेलाची भेसळ करण्यात आली होती, अधिनियमाच्या कलम ४६२ पोटकलम (४) खाली उद्भवणाऱ्या गृहीतक लक्षात घेता, तेल अपीलकार्याच्या ताब्यात होते आणि ते तेल विक्री करण्याकरिता साठवून ठेवण्यात आले होते आणि अपीलकर्त्यांच्या वतीने त्या गृहीतकाचे खंडन करण्यात आले नव्हते. अपीलकर्त्यांच्या वतीने विद्वान वकिलांनी या निष्कर्षांच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

रसायनशास्त्रज्ञांनी केलेल्या मोहरीच्या तेलाच्या नमुन्यांच्या विश्लेषणाशी संबंधित पुराव्यांचा आम्ही विचार केला आहे. आशित रंजन सेन, पी. डब्ल्यू. २, सार्वजनिक विश्लेषक, ज्यांनी दि. ३-४ जानेवारी १९५५ रोजी डॉ. बागुई यांनी पाठवलेल्या पहिल्या नमुन्याची तपासणी केली होती, त्यांना या आकडेवारीच्या आधारे त्यात भेसळ आढळली, की ४० अंश सेल्सिअसचा बी. आर. निर्देशांक ६०.४ होता आणि बेलियरची भुईमूग तेलाची चाचणी सकारात्मक होती, कारण त्यात २८ अंश सेल्सिअस या तापमानावर गढुळता दिसायला लागली. न्यायालयीन साक्षीदार क्र. १, दुलाल चंद डे, ज्याने प्रत्यक्षात न्यायालयाने पाठवलेल्या नमुन्याचे विश्लेषण केले होते, त्याने सॅपोनिफिकेशन मूल्य १७५.५, आयोडीन मूल्य १०६.८ अंश आणि २७ अंश सेल्सिअसवर अस्वच्छतेचे स्वरूप प्राप्त केल्याच्या आधारे तो नमुना त्यांना भेसळयुक्त आढळला. त्याला थोड्या प्रमाणात अळशीचे तेल असल्याचेही संकेत मिळाले. श्री मित्रा, डी. डब्ल्यू. ७ यांनी, या आकडेवारीवरील त्यांच्या मताची सत्यता मान्य केली आहे. या परिस्थितीत, अपीलकर्त्याच्या टँक वॅगनमधील मोहरीच्या तेलात भेसळ झाली होती असा कनिष्ठ न्यायालयांचा निष्कर्ष बरोबर आहे. अंमलबजावणी शाखेच्या उपायुक्तांनी श्री मित्रा यांना पाठवलेल्या मोहरीच्या तेलाचा नमुना या टँक वॅगन मधील मोहरीच्या तेलाचे होते हे सिद्ध झालेले नाही. त्यामुळे, श्री मित्रा यांचे त्या नमुन्याच्या स्वरूपाबद्दलचे मत, श्री सेन आणि श्री डे यांच्या मताच्या विरोधात जात नाही की त्यांनी विश्लेषण केलेल्या

मोहरीच्या तेलात भुईमूग तेल मिसळले होते.

अपीलकर्त्यांचा वादाचा दुसरा मुद्दा असा होता कि, जेव्हा डॉ. बागुई यांनी मोहरीच्या तेलाचे नमुने घेतले तेव्हा तेल त्यांच्या ताब्यात नव्हते आणि अधिनियमाच्या कलम ४६२ पोटकलम (४) खाली त्यांनी तेलाची विक्री करण्याकरिता साठवून ठेवले होते असे मानून त्यांच्या विरुद्ध कोणतेच गृहीतक करता येऊ शकत नाही. अपील मध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयावरून असे दिसून येते कि, उच्च न्यायालयासमक्ष झालेल्या सुनावणी मध्ये हे निर्विवाद होते कि, ज्या मोहरीच्या तेलाचे नमुने घेण्यात आले होते, ते मोहरीचे तेल अपीलकर्त्याच्या ताब्यात होते. अभिलेखावरील पुराव्यांवरून आमचे असे मत आहे की त्यांच्याकडे मोहरीचे तेल होते. तेलाची खेप, अपीलकर्ता क्र. १ निर्माणक फर्म कडून, स्वतःलाच कलकत्ता येथे देण्यात आली होती. दि. ३ जानेवारी १९५५ रोजी, निर्माणक फर्मचे व्यवस्थापक, अपीलकर्ता क्र. २ यांनी रेल्वे अधिकाऱ्यांकडून वॅगन सोडवून घेतले. डॉ. बागुई यांनी मोहरीच्या तेलाचे नमुने घेण्यापूर्वी सदरचे वितरण घेण्यात आले होते याचा कोणताही थेट पुरावा नाही. परंतु परिस्थिती, आमच्या मते, डॉ. बागुईच्या भेटीपूर्वी आणि वॅगन मधून तेलाचे नमुने घेण्यापूर्वीच अपीलकर्ता क्र. २ ने वॅगन सोडवून घेतल्याचे निर्णायक रीतीने सिद्ध करीत नाही. अपीलकर्ता क्र. २ ने जर रेल्वे अधिकाऱ्यांकडून वॅगन सोडवून घेतले नसते, तर तेलाचे नमुने घेण्याच्या उद्देशाने वॅगन उघडणे हे अपीलकर्ता क्र. २ कडून अपेक्षित नाही आणि वॅगन उघडून घेतले नसते. रेल्वे अधिकाऱ्यांनी स्वतः हे पाहिले असेल की कोणीही त्यांच्या प्रभारात असलेल्या वॅगनमधील सामग्रीशी छेडछाड करणार नाही. अपीलकर्ता क्र. २ ने म्हणून डॉ. बागुईच्या भेटीपूर्वी वॅगनसाठी वाहतूक आकार चुकता केला असावा आणि अशा प्रकारे वॅगन सोडवून घेतले असावे. त्यानंतरच त्याला वॅगनवर नियंत्रण मिळाले आणि तो त्यातून तेल काढण्याच्या किंवा इतरांना तेल काढण्याची परवानगी देण्याच्या स्थितीत होता. म्हणून आम्ही असे मानतो की जेव्हा डॉ. बागुई यांनी टँक वॅगनमधील तेलाचे नमुने घेतले तेव्हा अपीलकर्त्यांकडे टँक वॅगनमधील तेल होते.

तथापि, अपीलकर्त्यांतर्फे मुख्य युक्तिवाद असा आहे की अधिनियमाच्या कलम ४६२ च्या पोटकलम (४) अंतर्गत, अपीलकर्त्यांनी मोहरीचे तेल विक्रीसाठी साठवले होते हे गृहीतक खंडनीय आहे आणि यू. पी. ऑईल मिलर्स असोसिएशन व पोलीस उपायुक्त,

अंमलबजावणी शाखा यांच्यातील काही  विवक्षित व्यवस्था, तसेच ३ जानेवारी १९५५ रोजी अपीलकर्त्यांनी असोसिएशनच्या सचिवांना लिहिलेले पत्र (निशाणी आर) हे लक्षात घेऊन, त्याचे पूर्णपणे खंडन केले गेले आहे. अंमलबजावणी शाखेचे उपायुक्त आणि असोसिएशन यांच्यातील व्यवस्थेच्या पुष्ट्यर्थ  पाठवण्यात आलेल्या विविध कागदपत्रांचा आम्ही विचार केला आहे, परंतु त्यात आम्हला असे काहीही आढळून आले नाही जे अपीलकर्त्यांना भेसळयुक्त तेल असल्याचे आढळून आले तरी ते विकण्यापासून कायदेशीररित्या अटकाव करेल. ९ जून १९५४ रोजी झालेल्या यू. पी. ऑईल मिलर्स असोसिएशनच्या बैठकीच्या कार्यवाहीत अंमलबजावणी शाखेचे उपायुक्त व  सहाय्यक आयुक्त उपस्थित राहिल्याने असे दिसून येते की अशी कोणताही संमति झाली नाही. संघटनेच्या सर्व सदस्यांनी आपापल्या गिरण्यांना पत्र लिहावे  की  आयात केले जाणारे सर्व तेल प्रथम संमत करूनघ्यावे आणि नंतर वितरित करावे, अशी उपायुक्तांची सूचना पूर्णपणे स्वीकारली गेली नाही, सदस्यांनी फक्त असे म्हटले की ते नेहमी आणि नेहमीच शुद्ध मोहरीचे तेल आयात करतात. मात्र, तेलाचे नमुने दुसऱ्या दिवशी सकाळी म्हणजेच १०  जून १९५४ पासून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापि, आम्हाला असे आढळले आहे की नोव्हेंबर १९५४ मध्ये यू. पी. ऑईल मिलर्स असोसिएशनने अपीलकर्ता क्र. १ ला पत्र लिहिले की  पोलीस उपायुक्त, अंमलबजावणी शाखेच्या निर्णयानुसार, नमुना काढण्यासाठी आणि त्याची चाचणी करण्यासाठीच्या प्रत्येक अर्जासोबत, वॅगन  टँक  मधील मोहरीचे तेल हे शुद्ध मोहरीचे तेल होते, ज्यामध्ये काटेधोत्रा, अळशी किंवा इतर कोणतीही भेसळ नाही अशा आशयाचे रसायनशास्त्रज्ञ किंवा गिरण्यांचे व्यवस्थापक किंवा मालक यांनी स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र असले पाहिजे,  आणि फेब्रुवारी १९५५ व एप्रिल १९५५ मध्ये पोलीस उपायुक्त, अंमलबजावणी शाखेला यू. पी. ऑईल मिलर्स असोसिएशनला आठवण करून द्यावी लागली की जेव्हा ते बंगालच्या बाहेरून कोणतेही मोहरीचे तेल मागवतात, तेव्हा त्यांनी आपल्या सर्व सदस्यांना सल्ला द्यावा की रेल्वेच्या पावत्यांच्या सोबत कारखान्याच्या रसायनशास्त्रज्ञाचे, ज्याने त्याची तपासणी केली होती, त्याचे तपासणीचे स्पष्ट प्रमाणपत्र असावे. पोलीस उपायुक्त, अंमलबजावणी शाखेकडून देण्यात आलेल्या अशा निर्देशांचा कोणताही मोठा परिणाम झालेला दिसत नाही, कारण अपीलकर्त्यांना मिळालेल्या तेलाची खेप अशा कोणत्याही प्रमाणपत्राशिवाय होती. अपीलकर्त्यांच्या गिरणीचे रसायनशास्त्रज्ञ, डी. डब्ल्यू. १, महेंद्र कुमार गुप्ता यांनी मात्र

अभिसाक्ष दिली की, त्यांनी त्या वेगनमध्ये पाठवलेल्या तेलाचा नमुना घेतला होता आणि ते खरे मोहरीचे तेल असल्याचे आढळले, जे कोणत्याही भेसळीपासून मुक्त होते. पाठवलेल्या मोहरीच्या तेलाच्या शुद्धतेबद्दलचे असे कोणतेही प्रमाणपत्र रेल्वेच्या पावतीसोबत असल्याचे सिद्ध होत नाही आणि ते डॉ. बागुई यांना किंवा त्यावेळी त्यांच्यासोबत असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांना दाखवण्यात आले किंवा देण्यात आले असल्याचे सिद्ध होत नाही. अपीलकर्ता क्र. १ च्या वतीने पत्र निशाणी आर, ३ जानेवारी १९५५ रोजी सकाळी १० वाजता यू. पी. ऑईल मिलर्स असोसिएशनच्या सचिवांना पाठवण्यात आले होते.

पत्रात म्हटले आहे की :

"कृपया नमुन्याची व्यवस्था करा आणि संबंधित अधिकाऱ्यांमार्फत चाचणी करा, जेणेकरून विश्लेषणानंतर शुद्ध आढळल्यासच आम्ही तेल सोडवून घेऊ शकू ".

अपीलकर्त्याने स्वतःकडे कलकत्ता येथे पाठवलेले तेल विक्रीसाठी साठवले होते या गृहीतकाचे खंडन करण्यासाठी असे कोणतेही विधान पुरेसे असू शकत नाही. तेल विकले जाणार नाही असे पत्रात नमूद केलेले नाही. त्यात फक्त असे नमूद आहे की विश्लेषणानंतर तेल शुद्ध आढळले तरच ते तेल सोडवून घेऊ शकतात. परंतु , तेल अशुद्ध असल्याचे आढळून आल्यास त्याचे काय केले जाईल या बाबत नमूद केलेले नाही. भेसळयुक्त मोहरीच्या तेलाच्या संदर्भात कारवाई करण्यासाठी एकमेव प्राधिकारी कोण असेल याविषयी असोसिएशन आणि कॉर्पोरेशन यांच्यात कोणतीही व्यवस्था नव्हती. या परिस्थितीत, पोलिसांच्या अंमलबजावणी शाखेसोबतची सर्व तथाकथित व्यवस्था आणि 'निशाणी आर' सारखी त्यानंतरची पत्रे, हे विक्रीसाठी योग्य असलेले मोहरीचे तेल शुद्ध असावे हे पाहण्यास जबाबदार असलेल्या योग्य अधिकाऱ्यांना गोष्ट कठीण करण्यासाठी एक सूक्ष्म साधन असल्याचे दिसते.

याचिकाकर्त्यांच्या वॅगन टँक मधून मोहरीच्या तेलाचा कथित चौथा नमुना आणि त्याच्या शुद्धतेबद्दलचा गैर-वचनबद्ध अहवाल अस्तित्वात येण्यासाठी या प्रकारच्या व्यवस्थेने कशी संधी दिली आहे हे या प्रकरणातच स्पष्ट आहे. त्यामुळे आमचे असे मत आहे की पत्र 'निशाणी आर' किंवा ज्या व्यवस्थेमुळे असे संप्रेषण झाले, त्यामुळे हे सिद्ध होत नाही की अपीलकर्त्यांद्वारे विक्रीकरिता साठवले जाईल असे गृहीत धरले जाणारे वॅगनमधील मोहरीचे तेल हे विक्रीसाठी साठवले गेले नव्हते.

त्यामुळे आम्ही असे मताचे आहोत कि अधिनियमाच्या कलम ४६२ खालील अपराधासाठी अपीलकर्त्यांना दोषसिद्धि ठरवल्याचे योग्य आहे. त्यामुळे अपील फेटाळली जाते.

अपील फेटाळण्यात आली.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबाजवणीकरीता वैध मानला जाईल."